Annexure XII(5),(Vide Articles-12.02.03,12.02.06)

**राज्य शासकीय चतुर्थश्रेणी संवर्गामधील "शिपाई" कर्मचा-याच्या गणवेषाच्या शिलाई दरात व धुलाई भत्ता दरात सुधारणा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय, क्रमांक :गणवेष -३४०३/प्र.क्र.१२६/२००४/२९,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : २६ मार्च,२००८**

**पहा** :- १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: सीएलओ-१०७०-एक्स-एल, दिनांक ९ ऑक्टोबर,१९७०
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: सीएलओ-१०८१/१६४५/५-८१/२९, दिनांक १ सप्टेंबर,१९८२
३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: सीएलओ-१०८३/२५१४/२९, दिनांक १९ सप्टेंबर,१९९०
४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: पोषाख-१०८५/८९-८५/२९, दिनांक १५एप्रिल,१९९१
५) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: गधुभ-३५९४/प्र.क्र.३१/९५/२९, दिनांक ८ फेब्रुवारी,१९९६

**शासन निर्णय** :-

राज्य शासकीय चतुर्थश्रेणी संवर्गामधील "शिपाई" कर्मचा-यांना पुरविण्यात येणा-या गणवेषाच्या विविध बाबींमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यामध्ये शिलाई दरात सुधारणा करणे, महिला कर्मचा-यांच्या ब्लाऊजचे शिलाई दर वाढविणे, गणवेष धुलाई भत्ता दरात सुधारणा करणे तसेच, गरम कपडयाच्या गणवेषाच्या शिलाई दरात वाढ करणे हया बाबी समाविष्ट आहेत.

२. शासनाने वरील बाबींसाठी असणारे सध्याचे दर सुधारीत केले असून ते पुढीलप्रमाणे करण्यास मान्यता दिलेली आहे :-

(अ) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीएलओ-१०८३/२५१४/२९, दिनांक १९ सप्टेंबर,१९९० अन्वये विहित केलेले पुरुष शिपाई कर्मचा-यांचे गणवेष शिलाईचे दर प्रत्येक जोडीसाठी (एक शर्ट व एक पँट) रुपये २५०/- (रुपये दोनशे पन्नास फक्त ) तसेच महिला कर्मचा-यांच्या प्रत्येक ब्लाऊजच्या शिलाईचे दर रुपये ५०/-(रुपये पन्नास फक्त) इतके करण्यात यावेत.

(ब) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: गधुभ-३५९४/प्र.क्र.३१/९५/२९, दिनांक ८ फेब्रुवारी,१९९६ अन्वये शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक यांना विहित केलेल्या धुलाई भत्त्यात वाढ करुन हा भत्ता दरमहा रुपये ५०/-(रुपये पन्नास फक्त) इतका करण्यात यावा.

(क) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सीएलओ-१०८१/१६४५/५-८१/२९, दिनांक १ सप्टेंबर,१९८२ अन्वये विहित केलेल्या लोकरीच्या गणवेष (एक मीटर कॅनव्हास व बीन बटन्स् सह) शिलाई दरात वाढ करुन हा दर रु. ३५०/- (रुपये तीनशे पन्नास फक्त) इतका निश्चित करण्यात येत आहे.

(ड) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः पोषाख-१०८५/८९-८५/२९, दिनांक १५ एप्रिल,१९९१ नुसार महिला चतुर्थश्रेणी कर्मचारी (शिपाई) यांना दोन वर्षातून एकदा लोकरीची जर्सी खरेदी करण्यासाठी रु.२००/- (रुपये दोनशे फक्त) इतका दर निश्चित करण्यात येत आहे.

३. वरीलप्रमाणे दर सुधारित केल्यामुळे येणारा वाढीव खर्च संबंधित विभाग / कार्यालयाने त्यांच्या मंजूर अनुदानातून भागवावा.

४. सुधारीत दर दिनांक १ एप्रिल,२००८ पासून अंमलात येतील.

५. शिलाई दराची रक्कम व धुलाई भत्त्याची रक्कम प्रदान करताना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकःसीएलओ-१०७०/एक्सएल, दिनांक ९.१०.१९७० मध्ये नमूद केलेल्या शर्तीची पुर्तता करणे आवश्यक आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्रमांकः सीएलओ-१०७०/४/एल, दिनांक ५ जानेवारी, १९७१ अन्वये चतुर्थश्रेणी शासकीय कर्मचा-यांना देण्यात आलेले गणवेष कार्यालयीन वेळेत परिधान करणे आवश्यक आहे. तथापि, या सूचनांचे काटेकोरपणे पालन होत नाही असे निदर्शनास आल्यामुळे कार्यालयीन वेळेत गणवेष परिधान न करणा-या शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचा-यांविरुध्द दिनांक ३१ जानेवारी,.१९८५ चे शासन परिपत्रक क्रमांक-पोषाख-१०८४/११२/२९, तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-गणवेष-३४०२/प्र.क्र.११३/२००२/२९, दिनांक ३१ ऑगस्ट, २००२ अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करण्याच्याही सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत. तेव्हा हया सूचनांचा पुनरुच्चार करुन गणवेष परिधान न करणा-या कर्मचा-यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम १९७१ मधील नियम क्रमांक १० खाली शिस्तभंगाची कारवाई करण्याच्या सूचना संबंधित शासकीय कार्यालयांना याद्वारे देण्यात येत आहेत.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८०३२६१०५००५००१ असा आहे.

७. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक १३४/व्यय-४/०८, दिनांक ११ मार्च,२००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**प्र. मा. माळवदकर**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्री / राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव, /स्विय सहाय्यक
मुख्य सचिवांचे सह सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव,/ प्रधान सचिव/ सचिव

* प्रबंधक , मुळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई /नागपूर /औरंगाबाद.
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई /नागपूर /औरंगाबाद.
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
मंत्रालयाच्या निरनिराळया विभागातील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख

* महालेखाकार, महाराष्ट्र-१, मुंबई/महालेखाकार, महाराष्ट्र-२, नागपूर.

अधिदान व लेखा अधिकारी मुंबई/निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-४, विनियम शाखा, मंत्रालय.
उद्योग, उर्जा व कामगार विभाग( उद्योग-६),
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने /कक्ष,
निवड नस्ती, सामान्य प्रशासन विभाग/२९

* पत्राने

**राज्य शासकीय चतुर्थश्रेणी संवर्गामधील "शिपाई" कर्मचा-याच्या**
**<u>गणवेषाच्या शिलाई दरात व धुलाई भत्ता दरात सुधारणा करणेबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय, क्रमांक :गणवेष -३४०३/प्र.क्र.१२६/२००४/२९,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : ८ एप्रिल,२००८**

**पहा :-** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक :गणवेष -३४०३/प्र.क्र.१२६/२००४/२९, दिनांक २६ मार्च, २००८

**<u>शुध्दीपत्रक</u> :-**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक :गणवेष -३४०३/प्र.क्र.१२६/२००४/२९, दिनांक २६ मार्च, २००८ मधील शिर्षकाच्या पहिल्या ओळीतील **राज्य शासकीय चतुर्थश्रेणी संवर्गामधील "शिपाई" कर्मचा-यांच्या** ऐवजी **राज्य शासकीय चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचा-यांच्या** तसेच शासन निर्णयातील पहिल्या ओळीतील **राज्य शासकीय चतुर्थश्रेणी संवर्गामधील "शिपाई" कर्मचा-यांना** ऐवजी **राज्य शासकीय चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचा-यांना** असे वाचण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**प्र. मा. माळवदकर**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्री / राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव, /स्विय सहाय्यक
मुख्य सचिवांचे सह सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव,/ प्रधान सचिव/ सचिव
* प्रबंधक , मुळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई /नागपूर /औरंगाबाद.
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई /नागपूर /औरंगाबाद.
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त, /सर्व जिल्हाधिकारी,
मंत्रालयाच्या निरनिराळया विभागातील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
* महालेखाकार, महाराष्ट्र-१, मुंबई/महालेखाकार, महाराष्ट्र-२, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी मुंबई/निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-४, विनियम शाखा, मंत्रालय.
उद्योग, उर्जा व कामगार विभाग( उद्योग-६),
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने /कक्ष,
निवड नस्ती, सामान्य प्रशासन विभाग/२९

* पत्राने

F:\JACKY\Makne\Ganvesh \ Ganvesh Order 2.lwp